# बॉयलर ड्रमची यशस्वी उभारणी : भुसावळ विस्तारीत प्रकल्पाचे काम जोमात सुरू

**२ × ५०० भुसावळ मे.वॅ. प्रकल्प वेगाने पूर्णत्वाकडे**




महानिर्मितीच्या महत्वाकांक्षी विस्तारीत योजने नुसार ५०० मे.वॅ.च्या दोन संचांची उभारणी दीपनगर भुसावळ येथे सुरू असून त्यातील संच क्र.२ ची अत्यंत महत्त्वाची असलेली २१४ मे.टन वजन आणि २४.२ मीटर लांबीच्या बॉयलर ड्रमची ७५ मीटर उंचीवर उभारणी नुकतीच २० एप्रिलला अत्यंत यशस्वीपणे पूर्ण झालेली आहे.

या प्रसंगी कार्यकारी संचालक श्री.सुरेश नारखेडे, मुख्य महाव्यवस्थापक श्री.एम.जी. वाघमोडे, मुंबई यांची महत्वपूर्ण उपस्थिती होती. भुसावळ प्रकल्पाचे मुख्य महाव्यवस्थापक जी.आर. पाटील, भुसावळ औ.वि.केंद्राचे मुख्य महाव्यवस्थापक व्ही.एस. पाटील, भुसावळ प्रकल्पाचे महाव्यवस्थापक आर.एच. गौर. भुसावळ औ.वि. केंद्राचे अधीक्षक अभियंते तसेच भुसावळ प्रकल्पांतर्गत कार्यरत असलेले कार्यकारी अभियंता बी.के. चव्हाण उप कार्यकारी अभियंता पी.आर. टेकाडे, ए.आर. खान, वसावे इतर अभियंते आणि भेल, कारपारा, टाटा प्रोजेक्टचे अभियंते व अधिकारी यांची महत्वपूर्ण उपस्थिती होती.

बॉयलर ड्रमच्या यशस्वी उभारणी बद्दल महानिर्मिती कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक माननीय सुब्रत रथो, संचालक (प्रकल्प) श्री.डवलेकर, सुरेश नारखेडे कार्यकारी संचालक (प्रकल्प-२) कोराडी आदिंनी भुसावळ प्रकल्पाचे अधिकारी तसेच कामगारांचे अभिनंदन केले व पुढील प्रकल्प उभारणी कामासाठी सदिच्छा दिल्या.

राज्यात विजेची वाढती मागणी लक्षात घेता महानिर्मिती कंपनीने महत्त्वाकांक्षी विस्तारित प्रकल्प हाती घेतले त्यात भुसावळ विस्तारित प्रकल्प संच क्र. १ व २ प्रत्येकी ५०० मेगावॅट (१००० मेगावॅट) व्यतिरिक्त खापरखेडा विस्तारित प्रकल्प (५०० मेगावॅट), पारस विस्तारित प्रकल्प संच-२ (२५०), नवीन परळी प्रकल्प संच क्र. २ (२५० मेगावॅट), कोराडी ६६० मेगावॅटच्या प्रत्येकी ३ संचांचा समावेश आहे. एकूणच पारस, परळी, भुसावळ आणि खापरखेडा येथे प्रत्यक्ष प्रकल्पस्थळी कामे प्रगतीपथावर आहेत तर चंद्रपूर आणि कोराडी येथे प्राथमिक स्वरूपाची कामे हाती घेण्यात आली आहेत.

विशेष म्हणजे, ओझरखेड धरणाच्या बांधकामाकरिता महानिर्मितीकडून पाटबंधारे विभागाला ११७ कोटींची तरतूद करण्यात आली असून या धरणातून भुसावळ प्रकल्पाला पाणीपुरवठा होणार असल्याने साखरी, जाडगांव, तळवेल, बोहर्डी आणि ओझरखेडच्या परिसरात जमिनीखालील पाण्याच्या पातळीत वाढ होणार आहे आणि याचा लाभ हया परिसरातील शेतकऱ्यांना, नागरिकांना होणार आहे. तसेच प्रकल्पालगतच्या निंभोरा आणि पिंपरीसेकम या गावांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यात येणार आहे तर तापी नदीकाठी असलेल्या स्मशानभूमी परिसराची देखभाल करण्याचे काम नियोजित आहे. यासोबतच वीज अधिकारी, कर्मचारी व कुटुंबियांकरिता वसाहतीत अत्याधुनिक सभागृह इमारत, शाळा, दवाखाना, जलतरण तलाव, प्रशस्त क्रीडांगण, बाजारसंकुल इमारत, अत्याधुनिक व्यायामशाळा, विविध प्रवर्गाच्या कर्मचाऱ्यांकरिता ५५९ निवासी गाळयांची कामे नियोजित आहेत. पर्यावरणभिमुख हरितपट्टा विकसित करण्याच्यादृष्टीने परिसरात वृक्षारोपणाचे टप्पानिहाय नियोजन प्रस्तावित आहे. एकंदरीत, भुसावळ विस्तारित वीजप्रकल्पाची अतिशय वेगाने विकासात्मक वाटचाल सुरू असल्यामुळे येथील तरूणांना मोठया प्रमाणात प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरित्या रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत.

Printed & Published by Shri. Mahesh Aphale of Maharashtra State Power Generation Co. Ltd.
**Printed at Hema Arts,** 121, Sagar, Prabhat Ind., Estate, Near Dahisar Checknaka, W. Exp. Highway, Dahisar (E), Mumbai - 400 068. Ph : 2896 8221
& Published at Hongkong Bank Bldg, M.G. Road, Fort, Mumbai - 400 001.
The Company accepts no responsibility for the matter published in the journal.

संपादक : **महेश आफळे (जनसंपर्क अधिकारी)**
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, सृजन (महानिर्मिती),
प्रकाशगड, दुसरा मजला, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
(खाजगी वितरणासाठी)